(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. X / Issue – II ISSN 2277-8063

# राम मनोहर लोहिया यांचे समता विषयक विचार

डॉ. सुखदेव एस. उंदरे , सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र अधिविभाग , शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

---

राम मनोहर लोहिया यांनी भारतीय वैचारिक विश्वामध्ये आपल्या स्वतंत्र चिंतनाचा ठसा उमटविला आहे. विशेषतः डॉ. लोहियांनी भांडवलवाद व साम्यवाद या तत्त्व विचारातील समतेच्या आशयाचे अगदी सटीक विवेचन करून समता हे तत्त्व मानवाच्या जीवनातील कसे सर्वोच्च तत्त्व आहे हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. समतेचे प्रकार व समता साध्य करण्याच्या मार्गाविषयी लोहियांनी महनीय चिंतन समोर ठेवले आहे. लोहियांचे समता विषयक विचार हे आजही विषमतामुलक भारतीय समाजाच्या स्वातंत्र्य व समतेवर आधारित न्याय्य समाजाच्या स्थापनेसाठी प्रासंगिक असल्यामुळेच प्रस्तुत शोध पत्रातून त्यांच्या समता विषयक विचारांचे वस्तुनिष्ठ विश्लेषण करण्यात आले आहे.

डॉ. लोहियांनी समता तत्त्वाला मानवी जीवनाचा आधार सूत्र मानले होते. त्यांच्या मते, समते शिवाय स्वातंत्र्याची कल्पनाच केली जाऊ शकत नाही. भारतासारख्या अगदी नवोदित देशामध्ये पूर्वापार चालत आलेली विषमता हि जर दूर करावयाची असेल तर नव स्थापित राजकीय व्यवस्थेचा मूलाधार हा समता या तत्त्वावरच आधारित असला पाहिजे अशा प्रकारचा आग्रह लोहियांच्या समता विषयक चिंतनातून प्रखरतेने समोरे येताना दिसतो. भारतीय समाज हा विविधांगी विषमतेने ग्रासला असल्यामुळे या समाजातून जात-वर्ण-धर्म-पंथ-लिंग-अर्थ आदि आधारित विषमतेचे उच्चाटन करण्यातूनच समता प्रस्थापित होऊ शकते यावर लोहियांचा नि:सीम विश्वास होता.

समता हे माणसाला शतकानुशतके पाहिजे असलेले जीवनावश्यक मूल्यच म्हणावे लागेल. समाजात विषमता निर्माण होते. मग ती निसर्ग निर्मित असो की, मानवी सभ्यता व संस्कृतीने निर्माण केलेली असो, ती निश्चितच कायम स्वरुपाची नाही हा विश्वास माणसाच्या ठायी असल्यामुळेच मानवी इतिहासाच्या आजपर्यंतच्या इतिहासात प्रत्येक टप्प्यावर समतेसाठी विषमतेच्या विरुद्ध सतत संघर्ष होत असल्याचे दिसून येते. वर्तमानात, हे असे असले तरी भविष्यात ते असेच असणार नाही, या धारणेतून समता प्रस्थापित करण्यासाठी धडपडत असणाऱ्या माणसाला अपेक्षित यश भलेही प्राप्त होत नसेल, परंतु त्यामुळे तो ना ऊमेद मात्र होत नाही. बुद्ध, चार्वाक, महंमद, ख्रिस्तापासून ते डॉ. आंबेडकरांपर्यंत एक विचारवंत-आचारवंताची प्रदीर्घ समताग्रही परंपरा जगाच्या इतिहासाने पाहिली असून आजही ती परंपरा अक्षुण्णपणे पुढे जात आहे.[१] भारतासारख्या विस्तीर्ण भू-भाग व मोठी लोकसंख्या असणाऱ्या देशात समताग्रही विचार परंपरेला अनेक अडथळयांचा सामना करावा लागतो. असे असतांना देखील अतिशय प्रतिकुल अशा जात-पितृसत्ता आधारित समाजात खोलवर मुरलेल्या विषमतेचे समूळ उच्चाटन करण्यासाठी विचारवंत कष्ट घेतांना दिसून येतात. दिवसेंदिवस समाजाच्या समतेवर आधारित होत जाणाऱ्या बदलांमुळे आर्थिक रचनेत व आर्थिक रचनेत होत जाणाऱ्या बदलांनी समाजरचनेला देखील प्रभावित केले आहे. अशा सामाजिक अभिसरणाच्या प्रक्रियेत समाजाच्या सामूहिक अस्तित्वाला निरंतर करण्यासाठी भक्कम वैचारिक आधारांची आवश्यकता असते. कारण, जगातील कोणत्याही समाजाला एकत्र राहण्यासाठी आणि विशिष्ट पद्धतीच्या जीवनविषयक वाटचालीसाठी भक्कम अशा वैचारिक आधारांची वा विचारसरणीची निकड असते. आणि असे वैचारिक आधार निर्माण करण्याचे कार्य विचारवंत करीत असतात.[२] अशा भारतीय विचारपरंपरेतील अलीकडच्या काळातील एक महत्त्वाचे चिंतक म्हणजे समाजवादी विचारवंत राममनोहर लोहिया.

राम मनोहर लोहिया यांची राजकीय जाणीव किती प्रगल्भ होती याचा प्रत्यय त्यांच्या एकूणच समता विषयक विचारांवरून येतो. 'मानवी जाणीव ही स्वातंत्र्य गृहित धरल्याशिवाय संभवत नाही आणि स्वातंत्र्यामध्ये समता अनुष्युत असते व समता राज्य संस्थेची मागणी करते.' या विधानातून राममनोहर लोहियांच्या एकूणच राजकीय विचाराचे सार मांडता येते.[३] लोहीयांना स्वातंत्र्य व समतेमध्ये कोणत्याही प्रकारचा अंतर्विरोध दिसत नाही. त्यांच्या मते, मानवी आत्मभानासाठी स्वातंत्र्य आवश्यक आहे. असे स्वातंत्र्य जे कि, मानवाला मानवी जीवन जगण्यासाठी गरजेचे आहे. कारण, स्वातंत्र्याशिवाय व्यक्तिला आत्मजाणिव होत नाही आणि आत्मजाणिवेशिवाय मानवी जीवनाला अर्थ नाही. तेंव्हा स्वातंत्र्याच्या वातावरणातच व्यक्तिला आत्मजाणिव व आत्मभान प्राप्त करता येऊ शकते, नसता ते केवळ स्वप्नरंजन ठरते. त्यामुळे स्वातंत्र्य जसे व्यक्तिला आत्मभानासाठी आवश्यक आहे, तसेच व तितकेच स्वातंत्र्य उपभोगण्यासाठी ' समता ' आवश्यक आहे. लोहियांच्या मते, समतेशिवाय स्वातंत्र्याची कल्पनाच करता येऊ शकत नाही व समतेशिवाय स्वातंत्र्य उपभोगता येऊ शकत नाही.

लोहियांच्या मते, आधुनिक सभ्यतेमध्ये ज्या पद्धतीचा समाजरचना आहे ती विषमतेवर आधारित असणाऱ्या उतरंडी समान आहे. त्यामुळे आधुनिक सभ्यता ही माणसाला तसूभरही स्वातंत्र्य, समता व शांतता मिळवून देऊ शकत नाही. अशी परखड टीका त्यांच्याकडून केली गेली. समाजातील प्रत्येक व्यक्तिला तिच्या व्यक्तिमत्वाच्या आत्मसाक्षात्काराची समान संधी ज्या समाजात प्राप्त होते, तो समाजच स्वातंत्र्यपूर्व व न्याय्य असा समाज आहे असे त्यांचे स्पष्ट मत होते.

**भौतिक समानता व आध्यात्मिक समानता :**

राम मनोहर लोहियांना भौतिक समानता आणि आध्यात्मिक समानता या दोन्ही सारख्याच महत्वाच्या वाटतात. विशेष म्हणजे व्यक्तिचे ऐहिक जीवन हे तितकेच महत्वाचे आहे जीतके की, व्यक्तिचे आध्यात्मिक जीवन. भारतीय समाजातील आध्यात्मिक क्षेत्रात मोक्षाचे किंवा मोक्ष प्राप्तीचे जे पारंपारिक मार्ग म्हणून ज्ञानमार्ग, कर्ममार्ग, योगमार्ग आणि भक्तिमार्ग हे चार मार्ग सांगितले जातात. या चार मार्गाव्यतरिक्त डॉ. लोहियांनी 'समतामार्ग' या पाचव्या मार्गाची भर घातली आहे.[४] लोहियांच्या मते, मानवी जीवनात मोक्षप्राप्तीला निश्चितपणे महत्त्व आहे. परंतु ही मोक्षप्राप्ती म्हणजे केवळ मरणोत्तर मोक्षप्राप्ती नव्हे, तर जीवनातील मोक्षप्राप्ती व मरणोत्तर मोक्षप्राप्ती असा दुहेरी अर्थ मोक्षप्राप्तीला असल्याचे ते स्पष्ट करतात. लोहियांच्या मते, प्रत्येक व्यक्तिला त्याच्या जीवन प्रवासातच सुख, आनंद व समाधान लाभावयास हवे. कारण, सुख समाधानाशिवाय व्यक्तिचा मृत्यू देखील शांत व समाधानी होणार नाही. त्यामुळे मरणोत्तर मोक्षप्राप्तीत व्यक्तिचा विश्वास असो अथवा नसो व्यक्तिला त्याचा मृत्यू हा कोणत्याही प्रकारच्या असमाधान व खेद-खंतेशिवाय यायला हवा. याचाच अर्थ जीवनांतर्गत मोक्षाशिवाय मरणोत्तर मोक्ष हि कल्पनाच लोहियांना निरर्थक वाटते, आणि म्हणूनच मरणोत्तर मोक्षाची पूर्वअट म्हणून ते जीवनांतर्गत मोक्षाचा विचार करतात.

लोहियांच्या मते, शेवटी व्यक्तिला अशा प्रकारची मोक्षप्राप्ती करावयाची असेल तर समाजात समता असणे आवश्यक आहे, त्याशिवाय, अर्थात समतेशिवाय मोक्षप्राप्ती होणार नाही, या निष्कर्षाप्रत ते येऊन पोहोचतात.

**विषमतेविरुद्ध सप्तक्रांती :**

डॉ. लोहियांनी जन-शक्तीचे समर्थन केले आहे. समताधिष्ठीत समाजाचा विचार करीत असतांना त्यांनी जन-शक्तीचा विचार मांडला आहे. जन-शक्ती अर्थात जन-ईच्छा अर्थात लोक-ईच्छा या अर्थानी लोहिया जन-शक्तीचे समर्थन करताना दिसतात. लोहियांच्या समता विषयक चिंतनातून हे स्पष्ट होते कि, जन-शक्ती ही पुढील सप्त क्रांतीच्या माध्यमातून सर्व प्रकारच्या अन्याय व विषमतेविरोधात परिणामकारकरित्या करता येऊ शकते.

१) स्त्री - पुरुष समानतेकरिता
२) शरीराच्या रंगावर आधारित असमानतेविरुद्ध
३) जाती प्रथेविरुद्ध
४) परदेशी गुलामी विरुद्ध
५) खाजगी संपत्तीतील विषमतेविरुद्ध
६) खाजगी आयुष्यात अन्याय हस्तक्षेप दूर करणे व लोकशाही कार्यपद्धतीच्या आग्रहासाठी
७) शास्त्रास्त्रांच्या विरुद्ध आणि सत्याग्रहाकरिता

डॉ. लोहियांच्या मते, जगातील कोणत्याही समाजामध्ये सात प्रकारची अस्तित्वात असते व या प्रकारचे अन्याय व विषमतेचे उच्चाटन करण्यासाठी वरील सप्तक्रांतीची निकड असते. विशेषत: अविकसित व विकसनशील राष्ट्रांमध्ये अशाप्रकारच्या विषमतेचे व अन्यायाचे प्रमाण मोठे असते. अशा राष्ट्रांमधून जेंव्हा लोकांमध्ये विषमतेविरुद्ध खऱ्या अर्थाने जागरुकता येते तेंव्हाच सातही क्रांत्या यशस्वी होऊन समता प्रस्थापित होऊ शकेल यावर लोहियांचा ठाम विश्वास आहे.

**समतेचे सर्वांगीण स्वरूप :**

डॉ. लोहियांच्या मते, समाजात खरी समता अस्तित्वात येण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला त्याच्या प्रतिष्ठापूर्ण जीवन जगण्यासाठी आवश्यक मूलभूत गरजा पूर्ण झाल्याच पाहिजे. त्याचबरोबर केवळ संधीची समानता असली म्हणजे समता प्रस्थापित झाली असे म्हणणे चुकीचे असून समाजात सर्वस्तरावर समतेचा विचार होणे आवश्यक आहे, असे ते स्पष्ट करतात. त्यांच्या मते, समता ही अनेकविध स्वरुपाची असते. 'समता' ही जशी अंतर्गत तशी ती बहिर्गतही असते; समता ही देशांतर्गत तशीच ती आंतरराष्ट्रीय असते; समता ही वैधानिक, सामाजिक, आर्थिक, व सामाजिक अशी चौफेर स्वरुपाची असते; त्याचबरोबर समता ही एकीकडे अमूर्त तर दुसरीकडे मूर्त स्वरूपामध्ये दिसून येत असली तरी देखील समतेचे मूर्त स्वरूपच मानवासाठी अर्थपूर्ण ठरते.[५] यावरून लोहियांचे समता विषयक विचार किती मूलगामी स्वरूपाचे होते हे स्पष्ट होते.

निष्कर्षत: उपरोक्त वस्तुनिष्ठ विश्लेषणावरून असे स्पष्ट होते कि, लोहियांचे समता विषयक विचार हे अखिल मानवजातीसाठी होते. त्यांच्या विचारांमध्ये समस्त जगातील विषमतेविरुद्ध रोष तर होताच परंतु त्याचबरोबर या विषमतेचे समूळ उच्चाटन करण्यासाठी त्यांनी जनतेला ठोस अशी 'सप्तक्रांती' दिली. भारतातील जातीव्यवस्था, वर्गव्यवस्था व लिंगाधारित भेदभाव हे समतेच्या मार्गातील सर्वात मोठे अडथळे असून ते केवळ चौफेर समतेच्या विचाराने व सप्तक्रांतीच्या माध्यमातूनच दूर करता येऊ शकतात, हेच वास्तव लोहियांच्या समता विषयक विचारातून स्पष्ट होते. म्हणूनच जगातील सर्व देशांच्या तमाम समाज घटकांच्या सर्व स्तरातील व विशेषत: भारतासह तिसऱ्या जगातील सर्व उपेक्षित, गरीब आणि मागास घटकांच्या सर्वांगीण विकासाकरिता लोहियांचे समता विषयक विचार हे आजही प्रासंगिक ठरतात.

**संदर्भ सूची :**

१) भोले, भा. ल., 'विसावे शतक आणि भारतातील समता विचार', डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी, सातारा, १९९९, पृ. लेखकाचे हृदगत.
२) चौसाळकर अशोक, 'समकालीन समाजात विचारवंतांची भूमिका, विचारवंत आणि समाज', प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार गौरव ग्रंथ, द युनिक ॲकॅडमी, पुणे, २०१५, पृ.१७.
३) प्रसाद चंद्रदेव, 'पोलीटीकल आयडियास ऑफ डॉ. राम मनोहर लोहिया', कॉमनवेल्थ पब्लिशर्स, नवि दिल्ली, १९८९, पृ. ५९.
४) लोहिया, राम मनोहर, 'मार्क्स, गांधी ॲण्ड सोशालिझम्', नवहिंद पब्लिकेशन्स, हैदराबाद,१९६३, पृ. ३७८.
५) भोले, भा. ल., 'आधुनिक भारतातील राजकीय विचार', पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, २००३, पृ. ६५२.